

# संतसरिता

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २१७१
REFBK-0020045
REFBK-0020045



संतभोजराज

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों. दि: ........
२००४५
२३११७८
काव्य
२१८९

वा. क्र. २००४५

# संत सरिता

## कविता संग्रह

REFBK-0020045

संत भोजराज

प्रथमावृत्ती १९७२

किंमत दोन रुपये

प्रकाशिका :

**सौ. विमल भागवत राणे**

" अशोक प्रकाशन "

सावदा, जि. जळगांव.

*

मुखपृष्ठ चित्रकार :

**न. द. सपकाळे**

जी. डी. आर्ट ए. एम.

**अनुवाद, नृत्यीकरण, ध्वनीमुद्रण, नभोवाणी वितरण आदि हक्क कवि स्वाधीन**

*

मुद्रक :

श्री रामदास छापखाना

**सु. वि. परदेशी**

फैजपुर, जि. जळगांव

## अर्पण पत्रिका

२००४५
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

भारतात संत रामानूजापासून साहित्याचें दोन कार आढळतात. एक राजपरंपरा दुसरी संतपरंपरा भारतांत उच्च वर्णिय उच्चभ्रू समाजाचेच लोक रहातात. जीवंत जाहीरांत राज परंपरा शासनीय परंपरेत आढळते. भारतात देवाचं राज्य आहे. तो सर्वत्र कसा भरला आहे. संत परंपरा टाहो फोडीते. भारतांत लॉर्डांचे राज्य आहे. राजपरंपरा प्रचाराचा भाग ठरतो भारतांत श्रमिक संत रहातात संत बाजू छान मांडतात.

रामानुजापासून संत तुकारामापावेतो संत साहित्य परंपरा वेगळी, आगळी होतीं परंतू ह्या तीनशे वर्षांत आमुचे उच्चवर्णिय उच्चभ्रू म्हणविणारे मित्रांना संत साहित्य नाहीसे करण्यांत यश लाभले. सत्ता संपत्तीचे जोरावर श्रमिकांना गुलाम करणें, संतांचा पराभव करणें त्यांना जय मीळाला. भांरतांतील लाखो वाचनालयें विद्यामंदिरांत त्यांनी प्रवेश मिळविला. संत हाचि देव ह्या प्रचाराऐवजी शेटजी, भटजीच जनतेचे मनांत भरला कोटयावधी श्रमिकांना गुलाम करितांना भारतांतील स्थावर जंगम माल त्यांचे ताब्यात असला तरी भारतवासियांत्रे हृदय स्थानावर शिक्का मोर्तब करिता आलेले दिसत नाही.

आता भारतात प्रजेचें राज्य आहे. लोकशाही म्हटली जात असली तरी ती शेटजी भटजी मार्फत राबवावी ! कां ! श्रमीक संतांचे आशीर्वादाने नांदवावी. श्रमीकांनी, गरीबांनी अहोरात्र विचार करायला हवा.

श्रमिकांचे साहित्य श्रमिक लिहीतील आमुची घोषणा आहे. आमुची नववी कलाकृती " संत सरिता " कविता संग्रह भारतांतील सर्व संतांचे चरणी अर्पण करितो. आम्ही प्रत्यक्ष पाहिलेले श्रमिकसंत महात्मा गांधी, संत तुकडोजी महाराज, संत गाडगे महाराज, संत साने गुरुजी, संत धनाजी नाना कविता संग्रहाची माळा गळयात घालतांना संतांचा आशीर्वाद घेतो.

संत दास

संत भोजराज

## निवेदन :

दिनांक १८-२-१९१७ रोजी 'संत भोजराज' ह्यांचा जन्म खिरोदे येथे झाला. बाळपण सावदे गांवीं गेले. मराठी शाळा, व हायस्कूल पावेतो शिक्षण सावदे येथेच झाले. पोटासाठी सन १९३८ साली पोलिस खात्यांत नौकरी धरली. त्यांचं जनसेवा हेंच ध्येय असलं तरी परमेश्वर भक्ती व्यसन होते. साहित्य निर्मिती, जन-जागृति हा छंद होता.

आतां त्यांनी छपन्नावें वर्षात पदार्पण केले आहे. ते नौकरीतून निवृत्त झाले आहेत. पुढील आयुष्य संतप्रचारांत घालविणार आहेत. आतां पावेतो त्यांचे हातून एक्केचाळीस पुस्तकें लिहीली गेली आहेत. साहित्याचे प्रमुख सहा भाग ठरतात. सहाही भागांत लिखाण केले आहे. मराठी, हिंदी, उर्दू भाषेत लिहीतात. आपले लिखाण पुणे, मुंबई, नागपूरचे उच्चवर्णीय, उच्चभ्रू समाजातील लोकांनी प्रकाशित करावे अशी त्यांची फार इच्छा होती. उच्चवर्णीय प्रकाशकांनी त्यांचे तोंडाला पाने पुसली. संत भोजराजांनी त्यांचे उत्तरांचा अभ्यास केला. उच्चभ्रू साहित्यकांचा परिचय करुन घेतांना त्यांना खूपच त्रास झाला. अपमान सहन करावा लागला. त्यामुळे जो अनुभव आला, त्यावरुनच त्यांनी शोध लावला. शेटजी, भटजी सरकारचे नादाला लागणं म्हणजे आपल्या हातानं आपुले पायावर धोंडा पाडून घेणं होय.

त्यांना लाखो श्रमिकांचा सहवास घडला. संतांचा आशीर्वाद लाभला. जवळ नया पसा नसतांना "अशोक प्रकाशन" निर्माण झाले.

आतां पावेतो संत भोजराज यांची दहा पुस्तकें प्रकाशीत झाली. त्यांनी बावीस वर्षात एकाही श्रीमंताला मदत मागितली नाही.

एकाही उच्चवर्णीय साहित्यकाने त्याचा नामनिर्देश केला नाही. सरकारी अधिकाऱ्यांनी ढुंकूनही बघितले नाही. संत भोजराजांची कुणाबद्दल तक्रार नाही.

भारत देश हा लार्डांचा देश आहे. व राहील. उच्चवर्णीय उच्चभ्रू लोकांना जेवढा प्रचाराचा अधिकार आहे तेवढाच अधिकार तो श्रमिक संतांना आहे, हीच त्यांची तळमळ आहे. श्रमिक सामान्य लोकांचे घराघरांत परमेश्वर प्रभाव, संतवाणी, संतगाणी गायली जातांना संतांचे जीवन उजळो हाच उच्च हेतू दिसतो.

शिष्ट लोकांनी त्यांना टाळले. ढुंकूनही बघितले नाही. हा शद्ब-प्रयोग बरोबर नाही. असंत, अभक्तांना संत वाळीत टाकतात, हेच सत्य आहे.

संत भोजराजांना भगवान श्रीकृष्णाचें दर्शन घडले. विठोबा भेटला. लाखो संतांचे आशीर्वाद लाभल्याने संसारी जीवनांत सौख्य, आनंद, शांती पुरुन उरली. भारतांतील कोटयावधी संतांना देव कळावा, संतमहिमा समजावा हाच लिखाणाचा उच्च हेतू आहे.

संत भोजराजांचा सहवास, हरिभजन, प्रवचनांतून परमेश्वर दर्शन घडत असतं. संतजनांनी अवश्य लाभ घ्यावा ही विनंती आहे.

संत भोजराजांची पुस्तकें वाचल्याशिवाय संतपरंपरा समजणार नाही. त्यांची पुस्तकें विकत घेतल्याशिवाय पुढील पुस्तकें प्रकाशित होणार नाहीत.

संतजन आमुचे धर्मकार्याला प्रोत्साहन देतील अशी आम्ही अपेक्षा बाळगतो. व निवेदन संपवितो.

**अशोक प्रकाशन**

सावदा, जि. जळगाव.

# अनुक्रमणिका-

१ निंदकाचे घर
२ संत प्रेम देतात
३ मुद्दलांत नफाच राहिला
४ भारती अंध अंधारो बैसले
५ आम्ही पेरिला आंबा
६ किसीको कहना गुरु
७ जिंदगानीमे हमने
८ संत जनहो !
९ देशभक्ति हरीभक्ति
१० हरे राम ! हरे राम !
११ जगीं जे हिन
१२ रात्रं दिवस आम्ही
१३ आम्ही पाहिला देव
१४ जगाच्या कल्याणा
१५ आम्हां कथा कादंबरी
१६ आम्ही पेरिले पुण्य
१७ बा ! श्रमिका
१८ आम्ह ज्यांचेवर
१९ कर संसार
२० विठाई
२१ आम्हाला रहायला नाही झोपडी
२२ जेथे वघावे तेथे
२३ चला ! चला !
२४ बोलाचाच भात
२५ पैश्यांचे नांव अर्थ
२६ भटजीची मुलगी
२७ तुम्हो कितीही लपवा
२८ विठाई संतांची आई
२९ संतांचेच पाय धरा
३० साधु सत येती
३१ पायच मजबूत
३२ आम्ही राजियांचे राजे
३३ हरि ओम्ऽ
३४ सोनिआचा दिवस
३५ संत भोजराज वाणी
३६ पोटात काटे कसे भरायचे शाळेत शिका
३७ हरी आला रे आला
३८ लिखाणांत केली कटकट
३९ आम्ही मताँचे भिकारी
४० आम्ही होतो रंक
४१ आले देवाजीचे मना
४२ देवा जेथे बघावी तेथे
४३ प्रकाशले अंतरंग
४४ महान् संत ठरले
४५ देवा ! सगुण तव मूर्ति
४६ जडले रामनामी चित्त
४७ आमुचे घरी

४८ वाजें पाऊल आपुले
४९ राम प्रहरी फोडीत टाहो
५० देवाची शपथ
५१ आम्ही कांही भलाई
५२ संत मार्गाने चालायचे
५३ मन भजनांत रंगले
५४ देवा ! अजब तुझी करणी
५५ आम्ही डॉक्टर
५६ दम मारो दम
५७ श्रमिकांची निघाली दिंडी
५८ बहती है गंगा
५९ सावताने पेरिला मळा
६० भटजींचा निधर्म

क्रमांक २००४५ दि:
२१७०९ २३

# १. निंदकाचें घर

निंदकाचें घर असावें शेजारी ॥
मग बघांच भटजींची थोर बहादुरी ॥१॥

मंबाजींचेच घरीं करिती चाकरी ॥
संतांची निंदा हेंच किर्तन खरोखरी ॥२॥

शेटजीचें राज्य भटजी प्रचार करी ॥
पोटोबा पोटी विठोबा सारी माया नगरी ॥३॥

रामाचें मंदिर बांधायचे पैसा गोळा करी ॥
संतांचे हृदयांत देव! सत्याची पर्वा न करी ॥४॥

संत भोजराज वदति भारती भटजी करामत करी ॥
अंधश्रद्धा भक्ती रुढीची पेरणी करिती घरोघरी ॥५॥

# २. संत प्रेम देतात

संत प्रेम देतात प्रेमच घेतात ॥
असंत उपदेश करितात लोकांना फसवीतात ॥१॥

अभक्त किर्तनात रंगतात पैशातच दंगतात ॥
संत भजन करितात शिष्ट निंदा करितात ॥२॥

रावण भक्त संत द्वेष दगडांत देव पहातात ॥
संत देव हृदयांत समजून संतांनाच भजतात ॥३॥

संत भोजराज आहेत आधुनिक संत शिरोमणी ॥
असंत वदति न पडो कानी त्यांची वाणी ॥४॥

# ३. मुद्दलांत नफाच राहीला

आम्ही जीवनांत सितेचा राम पाहिला ॥
आम्हाला रस्त्यातच लंकेचा रावण भेटला ॥१॥

रामाशीं बोलण्यांत आम्ही वेळ घालवीला ॥
तरीच आमुचा संसार नीट नेटका झाला ॥२॥

आमुचा सुखाचा संसार राममय ठरला ॥
तरीच रावण भक्ताचें डोळयांत नच भरला ॥३॥

सुख दुःखाचा खेळ हंसतच वेळ घालवीला ॥
दुःख गळाले सुख जोडले मुद्दलांत नफा राहीला ॥४॥

संत भोजराजांना मायावी प्रश्न टाकतात काय कमवीले ॥
अहो ! आम्ही जे कमवीले ते रामाला अर्पीले ॥५॥



# ४. भारती अंध अंधारी बैसले

भारती अंध अंधारी बैसले ॥
तयांना दिवस रात्र ना कळे ॥१॥

राजहंस कुणाला म्हणावें नच शीकवीले ॥
वदति श्रमिकांस वदावे बटवाघुळ, कावळे, बगळें ॥२॥

असंतांचे बोल जे चकाकते ते वदावे सोने ॥
म्हणती साहित्याची श्रमिकांचे तोंडाला पुसा पाने ॥३॥

भारती अंध मीळतात सरकारी मापाने ॥
सत्ताधाऱ्यांची स्तुती जगती मान, अपमानाने ॥४॥

संत भोजराज वदति संतांनो जा प्रकाश मार्गाने ॥
सतीचा रहातो पती देव ! जगा संतांचें ईशाऱ्याने ॥५॥

# ५. आम्ही पेरिला आंबा

आम्ही पेरिला आंबा निंबोळी कशी लागणार ॥
गंगोत्रीपासून नीघाली गंगा रत्नाकराला भेटणार ॥१॥

कष्टावरच आमुची श्रद्धा आम्ही उपाशी कां मरणार ॥
हरिभक्तां घरी ऋद्धि सिद्धी पाणी भरणार ॥२॥

देहांत जाळतां रक्त ज्ञानज्योत प्रकाशणार ॥
हृदयांतील वीज केंद्र वीजेचें बील कोण करणार ॥३॥

ज्ञान हेंच अमृत ज्ञानियांचे संगती लाभणार ॥
चंद्र तेथे चंद्रिका, संभू तेथे अंबिका संत अमृत पिणार ॥४॥

संत भोजराज वदति संतांनो उठा वेग धरा ॥
काळ लागला पाठिसी रामाचेच भजन करा ॥५॥

# ६. किसीको कहना गुरु

किसीको कहना गुरु हमे समझता नहीं ॥
गुरु बिना गॅन मिलताही ही नही ॥१॥

हमे नही होना भटजीकी चल बुलाई ॥
है पसंत कष्ट मेहनतका दूध मलाई ॥२॥

सब नकटोंका मेला कौन गुरु कौन चेला
भारतमे है शेटजीका राज भटजींनका बोलबाला ॥३॥

संत भोजराज कहते श्रमिक खोज जाग जरा ॥
संत के गुरु संत हमेशा भज सितामाई बरा ॥४॥



# ७. जींदगानीमे हमने

जिंदगानीमें हमने हमेशा खोजा ॥
तो मि हमको करना पडा रोजा ॥ १ ॥

रातपर दिन उठाया सरपर बडा बोजा ॥
कोई बोले रह जिंदा अगर मर जा ॥ २ ॥

कोई हंसे या रुठे ! हमने पर्वा न किई ॥
दिन और रात भगवानके भक्तिमे गमाई ॥ ३ ॥

एक दिन हमें मीला भक्त भगवान ॥
लिखते गातें प्रभूजीका गीत और गान ॥ ४ ॥

संत भोजराज कहते भजो रामकृष्ण हरि ॥
भगवानही है संतोका संसार ताप हारी ॥ ५ ॥



# ८ संत जनहो !

संत जनहो ! संत असंत फरक कोण लोण्याचा मेणाचा गोळा ॥
संतास समजावें ज्ञान प्रकाश असंत भ्रमाचा भोपळा ॥ १ ॥

संत समजावें अमृत गोरस असंत कडू गोड विष ॥
संता सोबत रहतो देव असंत वैभव हांव एकमेव ॥२ ॥

धर्म म्हणजे सर्वांभूति ईश्वर निधर्म, अधर्माचा वर ॥
संत म्हणजे देव श्रद्धाभक्ति असंताची मायाच मुक्ती ॥ ३ ॥

संत भोजराज वदति संत असंत फरक ओळखा ॥
संत करिती जीवा शीवाची भेट असंत नागोबाचा विळखा ॥४॥

# ९, देश भक्ती हरि भक्ती

दे. भ. ह. भ. मधील कोणी ! फरक सांगेल काय ?॥
देशभक्ति पेक्षां हरिभक्ती भमिका श्रेष्ठच पहाय ॥१॥

दे. भ. ह. भ. मधील कोणी ! फरक सांगेल काय ?॥
देशभक्ती म्हणजे सत्ता संपत्तीचाच पूर वहाय ॥२॥

दे. भ. ह. भ. मधील कोणी ! फरक सांगेल काय ?॥
हरिभक्तींत देह, आत्म्यामध्यें भगवंत उभा रहाय ॥३॥

दे. भ. ह. भ. मधील कोणी ? फरक सांगेल काय ?॥
देशभक्ती म्हणजे राजस क्षणांत तामसकडे झुकजाय ॥४॥

दे. भ. ह. भ. मधील कोणी ! फरक सांगेल काय ?॥
हरिभक्ती म्हणजे अमृत पान देव संतच बनजाय ॥५॥

संत भोजराजांना ज्ञानाने संत असंत फरक कळला ॥
तरीच सत्ता संपत्तीपेक्षां कल हरिभक्तीकडेच वळला ॥६॥

# १० हरे राम ! हरे राम !

हरे राम ! हरे राम ! मंत्रानें झाले काय ?॥
जातियतेचे खाली डोके वरती गेले पाय ॥१॥

निधर्मा पेक्षां धर्म श्रेष्ठ अंतीम तरोणोपाय ॥
भक्ताला सदोदीत मीळते प्रभूचेच सहाय्य ।२॥

देह नाशवंत आत्मा अमर भारती घडला चमत्कार ॥
धन्य धन्य बापूजी संत घेतला देवाने गांधी अवतार ॥३॥

भारत शेटजी भटजींचा कशाला हवा लेखी पुरावा ॥
भटजीपेक्षां संत अहिंसापरमोधर्मक संशय न धरावा ॥४॥

संत भोजराज वदति संत मारीत मरत नसतो ॥
असंत, भक्तांची संघटना मृगजळाचा भाग ठरतो ॥५॥

# ११. जगीं जे हिन !

जगीं जे हिन अती पतीत ॥
जगीं जे दीन प द द ली त ॥१॥

तयांना जाऊनी उ ठ वा वें ॥
जगांला प्रेम अ र्पा वे ॥२॥

धर्म राजकारण नच एक समजावें ॥
असंतांनी संतांचें भांडवल न करावें ॥३॥

संत जनहो ! सानेगुरुजी संतच समजावें ॥
अभक्तांनी कृपया संतांचे वाटेला न जावें ॥४॥

संत भोजराजांनी सानेगुरुजींना हात जोडावें ॥
राजकीय पुढाऱ्यांनी सत्तेचीच दारू प्यावें ॥५॥

# १२ रात्रं दिवस आम्ही !

रात्रं दिवस आम्ही ! भटजींचेच कां ऐकावें ॥
भारती सत्ययूग नव्हें ! हे कलियूग समजावें ॥१॥

आतां श्रमिकांना कळते भटजींनी कां ! शिकवावें ॥
लोकशाही हे निधर्मयूग ! संतांनी संतयूगच वदावें ॥२॥

कोटीतून जन्मा येतो संत ! संतांना कां न कळावें ॥
ज्ञानमय, प्रकाशमय ज्योतीसाठीं संतांचेच पाय धरावें ॥३॥

संतांचे धरिता पाय ! सहज सांपडतो उपाय ॥
संत हाचि देव अंती देवच तरणोपाय ॥४॥

संत भोजराज झाले धन्य ! घडतां संत तुकडोजी दर्शन ॥
शद्धामागुनी नीघती शद्ब गाती संतांचे गुणगान ॥५॥



# १३. आम्ही पाहिला देव !

आम्ही एकदां पाहिला देव लाखो श्रमिकांमधून ॥
सावदा फैजपूर मध्यें होता सप्ताह होती रामधून ॥१॥

हजारोंच्या घोळक्यामध्यें होते बावळट ध्यान ॥
गुळाचें अभिलाषेने भक्त विसरत होते भूक तहान ॥२॥

असा कसा तुमचा देव ! घेतो दुसऱ्याचा जीव ॥
गोड गाडगेबुवांचें बोल करित होते घरठाव ॥३॥

धंन्य भारत ! धन्य महाराष्ट्र ! संतांचेच माहेरघर ॥
राजकारण, धर्मांचे भांडवलावर पुढारी करिती व्यापार ॥४॥

संत भोजराजांनी गाडग्यातुनी चाखली गोड थुली ॥
तरीच संसारातील काढितां सार नीघाली भुली ॥५॥



# १४. जगाच्या कल्याणा

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति ॥
राजकारणात घेतां भाग लौकर पुढे येति ॥१॥

सन छत्तीस साली फजीतपूरचे झाले फत्तेपूर ॥
भारतिय लाखो संतांनी फैजपूरचें बनविलें पंढरपूर ॥२॥

धन्य खान्देश जिल्हा संत धनाजी नाना जन्मले ॥
त्यांचेच कृपेने लेबासमाजाला नवीन वळण लागले ॥३॥

अरेरे ! एकदिन जे घडूं नये तेंच घडलें ॥
राक्षसाने करितां ठार संताला अमरपद लाभले ॥४॥

संत भोजराज गाती संत धनाजी नानांचे गुणगान ॥
संतांचेच प्रेरणेने संत परंपरेचें करिती कौतूक छान ॥५॥



# १५. आम्हां कथा कादंबरी

आम्हां कथा, कादंबरी, नाटक, टीका, गाणें ॥
प्राप्त झालें महान् अभ्यास चिंतन, मननाने ॥१॥

अढळपद, अमरपद, सम्राटपद लाभले प्रभू दर्शनाने ॥
प्रसिद्धी पैसा मीळाला संत आशीर्वादाने ॥२॥

आम्ही अत्यंत ऋणी, आभारी श्रमिकजनांचे ॥
मुद्दामच संबंध टाळले शिष्ट, उच्चभ्रू जनांचे ॥३॥

संत भोजराजांचा जन्म संतासाठीच आहे ॥
भारतांत पन्नास कोटी संत साहित्त्यप्रचार आहे ॥४॥

# १६. आम्ही पेरिले पुण्य

आम्ही पेरिले पुण्य उगवले पुण्याचें जोराने ॥
बापजाद्यांची शीकवण आली सुंदर फुलें पानें ॥१॥

लागली साहित्त्या गोड फळें प्रभू दर्शनाने ॥
संतांचें बाजारी विकतो अभंग मान पानाने ॥२॥

कुणीं गोविंद घ्या ऽ कुणी गोपाळ घ्या ऽ गातो गाने ॥
असंत अभक्त वदति साहित्त्य विका रद्दीचें भावाने ॥३॥

आमुचा व्यापार बघून मंत्री स्वागत करितो नमस्काराने ॥
उच्चवर्णिय मट भिक्षूक बघतात दानाचे अभिलाषेने ॥४॥

संत भोजराजांनी केला साहित्त्यसंसार संतपरंपरेने ॥
मंबाजी, तुंबाजी जळतात. बघतात काक नजरेने ॥५॥

# १७. वा ! श्रमिका

वा श्रमिका ! सरकार बनविणें तुझेच हाती आहे ॥
त्या अगोदर तुझ्यांतील बदल प्रगतिच ठरली आहे ॥१॥

सरकार कोणतेही येवो ! अथवा नामशेष होवो ॥
तुझी कष्ट त्यागावरील श्रद्धा हृदयि पांडुरंग भावो ॥२॥

संत, असंतांतील फरक हरिपाठच म्हटला जावो ॥
देह आत्म्याचें ज्ञान हाच ज्ञानाचा भाग राहो ॥ ३ ॥

गांठायची दिल्ली अगर पंढरपूर ! कर मनांशी विचार ॥
देव दिव्याचा बनतां काच दिवा ! कसा हो विझणार ॥४॥

संत भोजराज वदति संतांनाच तुम्ही निवडून द्या ॥
असंतांचा वांझ उपदेश उकिरड्यांत टाकून द्या ॥ ५ ॥

# १८. आम्ही ज्यांचेवर

आम्ही ज्यांचेवर विश्वास ठेवावा ॥
त्यांनीच आमुचा गळा कापावा ॥ १ ॥

ज्याला आम्ही दूर ढकलावा लोटावा ॥
तोच शेवटी उपयोगी पडावा झटावा ॥ २॥

जो नच परिचयाचा त्याने संकटीं आधार द्यावा ॥
भरवश्याचे म्हशीला टोणगाच व्हावा ॥ ३ ॥

जग दिल्या घेतल्यांचें छान अनुभव यावा ॥
तारुण्य गेले जरा आले पदरीं पश्चाताप पडावा ॥४॥

संत भोजराज वदति शेवटीं अंती राम भजावा ॥
पुढचे जन्माची बिजवाई केळी, उस लावावा ॥ ५ ॥

# १९. कर संसार

बा श्रमिका ! रात्रंदिन कर मनांशीं विचार ॥
कष्टावर ठेव श्रद्धा ! नकोच वाममार्ग कुविचार ॥१॥

दारु, मटका, लॉटरी तिकीट दुष्टांचें हत्यार ॥
अति शहाण्यांचा पोरगा रिकामा असतो बेकार ॥२॥

कावा दावा पावा हाजी हाजी हाच रोजगार ॥
नच उद्योग धंदा मतांचे भिकारी फिरती दारोदार ॥३॥

भारती राज्य शेटजीचें भटजींचीच लोकशाही ॥
नाऱ्या, नुऱ्या, पिऱ्या पासून धोका काळशेट कारवाई ॥४॥

संत भोजराज वदति नको नको संसार शिरावरी भार ॥
नको काढू सार भजराम! सुखाने कर संसार ॥५॥

# १८. आम्ही ज्यांचेवर

आम्ही ज्यांचेवर विश्वास ठेवावा ॥
त्यांनीच आमुचा गळा कापावा ॥ १ ॥

ज्याला आम्ही दूर ढकलावा लोटावा ॥
तोच शेवटी उपयोगी पडावा झटावा ॥ २॥

जो नच परिचयाचा त्याने संकटीं आधार द्यावा ॥
भरवश्याचे म्हशीला टोणगाच व्हावा ॥ ३ ॥

जग दिल्या घेतल्यांचें छान अनुभव यावा ॥
तारुण्य गेले जरा आले पदरीं पश्चाताप पडावा ॥४॥

संत भोजराज वदति शेवटीं अंती राम भजावा ॥
पुढचे जन्माची बिजवाई केळी, उस लावावा ॥ ५ ॥

# १९. कर संसार

बा श्रमिका ! रात्रंदिन कर मनांशीं विचार ॥
कष्टावर ठेव श्रद्धा ! नकोच वाममार्ग कुविचार ॥१॥

दारु, मटका, लॉटरी तिकीट दुष्टांचें हत्यार ॥
अति शहाण्यांचा पोरगा रिकामा असतो बेकार ॥२॥

कावा दावा पावा हाजी हाजी हाच रोजगार ॥
नच उद्योग धंदा मतांचे भिकारी फिरती दारोदार ॥३॥

भारती राज्य शेटजीचें भटजींचीच लोकशाही ॥
नाऱ्या, नुऱ्या, पिऱ्या पासून धोका काळशेट कारवाई ॥४॥

संत भोजराज वदति नको नको संसार शिरावरी भार ॥
नको काढू सार भजराम! सुखाने कर संसार ॥५॥

# १८. आम्ही ज्यांचेवर

आम्ही ज्यांचेवर विश्वास ठेवावा ॥
त्यांनीच आमुचा गळा कापावा ॥ १ ॥

ज्याला आम्ही दूर ढकलावा लोटावा ॥
तोच शेवटी उपयोगी पडावा झटावा ॥ २॥

जो नच परिचयाचा त्याने संकटीं आधार द्यावा ॥
भरवश्याचे म्हशीला टोणगाच व्हावा ॥ ३ ॥

जग दिल्या घेतल्यांचें छान अनुभव यावा ॥
तारुण्य गेले जरा आले पदरीं पश्चाताप पडावा ॥४॥

संत भोजराज वदति शेवटीं अंती राम भजावा ॥
पुढचे जन्माची बिजवाई केळी, उस लावावा ॥ ५ ॥

# १९. कर संसार

बा श्रमिका ! रात्रंदिन कर मनांशीं विचार ॥
कष्टावर ठेव श्रद्धा ! नकोच वाममार्ग कुविचार ॥१॥

दारु, मटका, लॉटरी तिकीट दुष्टांचें हत्यार ॥
अति शहाण्यांचा पोरगा रिकामा असतो बेकार ॥२॥

कावा दावा पावा हाजी हाजी हाच रोजगार ॥
नच उद्योग धंदा मतांचे भिकारी फिरती दारोदार ॥३॥

भारती राज्य शेटजीचें भटजींचीच लोकशाही ॥
नाऱ्या, नुऱ्या, पिऱ्या पासून धोका काळशेट कारवाई ॥४॥

संत भोजराज वदति नको नको संसार शिरावरी भार ॥
नको काढू सार भजराम! सुखाने कर संसार ॥५॥

# २०. विठाई

विठाई ! तूं काय दिले नाहीं सांग माझे आई ॥
सहज केली मागणी तुझीच घडली नवलाई ॥१॥

माझी करणी तुझीच भरणीं संत संगत मेळा ॥
धन, कन, कीर्ति सोबत मीळाला लोण्याचा गोळा॥२॥

शाश्वत अशाश्वतांतील फरक हवें तेंच तूं दिलें ॥
माझे माझे कवटाळीतां हंसत खेळत तुलाच अर्पीले ॥३॥

नको ! नको ! सत्ता अधिकार लाभावा तव सहवास।
धन, दौलत मान नको ! बनावा संताचा दास ॥४॥

संत भोजराजाची पुरवी मनीषा रुकमादेवीवरा ॥
सावदा फैजपूर ऐवजी भोजपूर पंढरपूर जाहिर करा ॥५॥

# २१. आम्हांला रहायला नाहीं झोपडी

आम्हांला रहायला नाहीं झोपडी ॥
मग आम्ही कां ! प्यावी खोपडी ॥१॥

खोपडीने मनुष्य बेशुद्ध सहज मरतो ॥
तर तो पिण्यासाठीं भांडी कुंडी कां ! वीकतो ॥२॥

जो उठतो तो सरकारला दोष लावीतो ॥
आपण सरकार आहोत हे तो शिष्ट विसरतो ॥३॥

निधर्मी राज्यांत शेटजी भटजींनी धर्म सांगावें
तूं हो मंत्री! मी बनतो संत्री! दोघांनी दारुच प्यावें ।४

संत भोजराज वदति भक्तिचाच प्याला लावा अधरा ॥
जो विष प्याला तो मेला दारुब्याचा कशाला शोक करा ॥५॥

# २२. जेथे बघावें तेथें

जेथें बघावें तेथें तुझीच मूर्ति ॥
तुला बघतांच देवा ! सहज येते स्फूर्ति ॥१॥

संत संगत घडतां येतां सुकाळ ॥
रात्रंदिन जातो सौख्य आनंदात वेळ ॥२॥

गोड तुझे नाम संत वर्णीती लिला ॥
मायेलाच बघून देवपण वैभवाने भुलला ॥३॥

ज्ञान विज्ञान हेंच जग देवाने निर्मीयेले ॥
अज्ञान हेंच ज्ञान असंतांनी भारती प्रचारीले ॥४॥

संत भोजराजांनी ज्ञानाने देव जाणला ॥
असंताचा देवच वेगळा विषमतेने तो कळला ॥५॥

# २३. चला! चला!

चला चला आले बोलावणें हंसत गा प्रभूचे गाणें ॥
मागे पुढती काय बघायचें नच उरले गाऱ्हाणें ॥१॥

जेथुनी आम्ही आलो हो ऽ तेथेची चाललो ॥
राम करणी राम भरणीं रामाचेच गीत गायिलो ॥२॥

श्रीराम जयराम जय जय राम मंत्र जपा
रामकृष्ण हरि रामकृष्ण हरी घालवी संसार तापा ॥३॥

आमुचे सासर माहेर एकच पती आमुचा देव ॥
संत हाचि देव! देव हाचि संत! धूपछाव एकमेव ॥४॥

संत भोजराज वदति अमृत खायचें अमृत प्यायचें ॥
यमाची कशाला भीती राम भजनाने मरण जिंकायचें ॥५॥

## २४. बोलाचाच भात

बोलाचाच भात बोलाचीच कढी ॥
खाऊनिया मढी राहील कैसी खडी ॥

संत भोजराज वदति नको करुं भानगडी ॥
संतांचेच पाउलावर उभा रहा हरघडी ॥ १ ॥

## २५. पैशांचे नांव अर्थ

पैशांचें नांव अर्थ ॥
पैसाच करितो मोठा अनर्थ । १॥

असंतांचा पैसाच मथितार्थ ॥
पैसाच चरितार्थ परमार्थ ॥ २ ॥

संत भोजराज निस्वार्थी संत ॥
तरीच संतांना आहेत पसंत ॥ ३ ॥

# १६. भटजीची मुलगी

भटजीची मुलगी प्रवचन करिते सरोजबाला ॥
शेटजीचा राम शेटजीची सिता हाच बोलबाला ॥ १ ॥

राम देव होता सिता देवी आम्हांला कळत कां नाहीं ॥
भटजीचें पाठांतर भाषांतराची जरुरत आतां नाही ॥२।

श्रीमंत गरिब फरक शेटजी मायावी ठरले ॥
रावणराज्य प्रचारासाठीं भटजीच मारिच बनले ॥ ३ ॥

लोक शाहीत हवि श्रमिक सिता विठ्ठल रुकमाई ॥
कामानंतर भजायचें राम हीच बाप पुण्याई ॥४॥

संत भोजराज वदति भारति शेटजी राज्य विसरु नका ॥
राक्षसांचें ऐकू नका हेंच सांगत होता संत तुका ॥ ५ ॥

# २७. तुम्ही कितीही लपवा

तुम्ही कितीही लपवा म्हणे झाले खेळीमेळीने ॥
अहो ! राजकारणांत आळीपीळी शेवट कानपिळीने ॥१॥

आजचा मंत्री उद्याचा संत्री बनतो पाताळयंत्री ॥
संत्रीं मंत्री पाताळयंत्री नंतर ठरतो धन्वंत्री ॥२॥

पापाचा भरताच घडा तो फुटतो निवडणुकीने ॥
जो फिरत होता विमानानें तो चालतो नग्नपायाने ॥३॥

करावें तसें भरावें द्यावें तसें घ्यावें संतांचा निवाडा ॥
राजकारणांत ध चा मा शाहीर गाती मंत्री पवाडा ॥४॥

संत भोजराज फोडिती टाहो जनहो सोडा अधर्म जोडा धर्म
कामानंतर राम भजनांतच रहातें धर्माचे मर्म ॥ ५ ॥

# २८. विठाई संतांची आई

विठाई ! संतांची आई तुझा मी बाळ नेणता ॥
घेई कडेवर पडता झडता मी तर झालो मोठा आता ॥१॥

खूप केले कष्ट नौकरीत घडली जनसेवा ॥
तुझ्याच कृपेने अन्न पोटभर मीळाली मीठाई मेवा ॥२॥

मला असंतांनी दूर लोटले संतांनी जवळ केले ॥
सर्व संसाराचा सार तव कृपेने सौख्य लाभले ॥ ३ ॥

आता नच मागणें कांहीं तुझा विसर न व्हावा ॥
जन निंदोत वानोत मम देह तव चरणी पडावा ॥ ४ ॥

संत भोजराजांना सर्वत्र दिसू लागली विठाई ॥
तरीच रात्रंदीन हांक मारतात जवळ घेई माझे आई ॥ ५ ॥

# २९. संतांचेच पाय धरा

आश्चर्य चमत्काराचा खूपच झाला बोलबाला ॥
जाऊन बघतां प्रवचन करित होती भटजीची बाला ॥ १ ॥

शारदेचा अवतार आमुची माता अंधांना शोध लागला ॥
घालीती लोटांगण वंदीती चरण शेटजींचीच लिला ॥२॥

ज्ञानदेव नामदेवाचे पाठी बाला हाणीत होती काठी ॥
सहाशे रुपयांची माया खोचीत होती ओटी पोटी ॥ ३ ॥

धन्य सावदा फैजपूर येथे अवतार घेतो जगत्जेठी ॥
शेटजी भटजींची एकी एकमेका घालीती मीठी ॥ ४ ॥

संत भोजराज वदती शेतकरी राजा जाग जरा ॥
संत असंतातील फरक संतांचेच पाय धरा ॥ ५ ॥



# ३०. साधू संत येति

साधू संत येति घरा ॥
तोचि दिवाळी द स रा ॥ १ ॥

नव्हे ! नव्हे ! यंत्र युगांत सारे विसरा ॥
गांवांत आले मंत्री पंचारती करा ॥ २ ॥

लाचारी भिकेची झोळी खाली पसरा ॥
साधू संता ऐवजी पुढाऱ्यांचें पाय धरा ॥३ ॥

दुनिया झुकती है झुकाने वाला होना ॥
चलती का नाम गाडी भाट गाते है गाना ॥४॥

संत भोजराज प्रभू भजनी झाले गुंग ॥
ज्ञानामय बनले अंग संतांचाच रहातो संग ॥५ ॥



# ३१. पायच मजबूत

पायच मजबूत चालतात मनाच्या ईश्याऱ्याने ॥
चंचल मन सदा धांवते ! वाऱ्याचे वेगाने ॥ १ ॥

मनां पेक्षां बुद्धि थोर बनते चिंतन मननानें ॥
मोह मायेचा मृग धांवतो मृगजळ आशेने ॥ २ ॥

ज्ञान, विज्ञान, प्रकाश अंधार, मार्गच सनातन ॥
संत असंतातील फरक चेतन अचेतन ॥ ३ ॥

मी ! मी ! माझे ! माझे ! आवाज असंतांचां ॥
राम ! राम ! हरि ! हरि ! सोपा मंत्र संतांचा ॥ ४ ॥

संत भोजराजा लाभली शांती प्रभू दर्शनाने ॥
ब्रह्मानंदी लागली टाळी संतचरण कमल फूलाने ॥ ५ ॥



# ३२. आम्ही राजियांचे राजे

आम्ही राजियांचे राजे संतांचे मायबाप आजे ॥
करुं काम भजूं राम असंतांचें नादी न लागायचें ॥ १ ॥

मऊ मेणाहुनि आम्ही विष्णूदास वज्रासम ऐसे ॥
ना तरी देऊ कासे चीलंगोटी नाठाळांचे पाठी काठी बसे॥२॥

ऐका ऐका संत जनहो ! भक्त अभक्तांतील फरक जाणा ॥
सोडा पुढाऱ्यांचा नाद पंढरिनाथालाच वाणा ॥ ३ ॥

संत भोजराज वदति संकटी संताचीच सांगड आणा ॥
पैलतीरा चालली दिंडी मुखे विठ्ठल विठ्ठल म्हणा ॥४॥



# ३३. हरि ॐ

हरि ओम् ऽ हरि ओम् ऽ हरि ओम् ऽ ॥
एक आत्मा बोले एक आत्मा बोले एक आत्मा बोले ॥ १ ॥

टॅहाः टॅहाः टॅहाः
मै कहाँ ऽ मै कहाँ ऽ मै कहाँ ऽ

जीव शीवका होता संगम जहाँ ऽ ॥
नरका नारायन बनता वहाँ ॥१॥

जलम जलमके साथी ॥
भगवानका गीत गाती ॥

संत भोजराज कहते बेटा मत बोल मै कहाँ ॥
संत के घर तूं आई मेरे यहाँ ऽ मेरे यहाँ ऽ ॥



# ३४. सोनियाचा दिवस

सोनियाचा दिवस आजी उगवला भगवंता ॥
आले परब्रह्म माझे घरां दर्शन घडले संता ॥

काय वर्णू तुझी लिला देवा तूं पुरुन उरला ॥
मुखे गाता गाथा वेद पोटी आनंदे भरला ॥२॥

काय सांगू देवा नच हेवा ! माझी मागणी संपली ॥
तव गोड नाम खाता पिता भूक तहान हरपली ॥३॥

झालो धन्य चुकला फेरा संत येता माझे घरां ॥
मी ! मी ! माझे ! माझे ! पडला विसर आज
दिवाळी दसरा ॥४॥

संत भोजराज रात्रंदिन प्रभूभजनी झाले गुंग ॥
सरली काळरात्र उगवला मित्र घडतां संत संग ॥५॥

# ३५. संत भोजराज वाणी

संत भोजराज वाणी ॥
संतांचें माळेतील मेरुमणी ॥१॥

स्वर्ग भास नर्क आभास आहे ॥
असंतांचे टाळक्यांतील आकाश आहे ॥२॥

चम् चम् चमकतात पुढाऱ्यांचे बोल ॥
भारतांत संतांचे बोलांनां नच मोल ॥३॥

शत्रू मित्र खेळ घोर निराशेचा ॥
संतांचा सहवास मार्ग मोक्षाचा ॥४॥

आशेचा तबला निराशेचा डग्गा ॥
पुढाऱ्यांचा सूर दारुचा अड्डा ॥५॥

प्रेमाची मुरली भक्तींचाच सूर ॥
संतांचें घरांत आनंदाचा पूर ॥६॥

धा धी धाक् धि न्ना ॥
मी ! मी ! मीच पुढारी अण्णा ॥७॥

जो वरी नच श्रद्धा कष्टावरी ॥
तो वरी वनवास आमुचे घरीं ॥८॥

असंतांनो नकाच येऊ संत दर्शनाला ॥
संत असंतातील फरक नच कळला ॥९॥

भाट कवि गातात रोज राज दरबारी ॥
संत प्रभूचे गान गातात संत घरोघरी । १०॥

संता साठि असंताजवळ खूप उपदेश आहे ॥
जगाचे कल्याण संतांचा उद्देश्य आहे ॥११॥

महानंदेचे आकर्षण दिल्लीचे किल्लीत आहे ॥
संत बनतांच सती पती देवच आहे ॥१२॥

सुष्ट दुष्टांतील फरक शासनिय दप्तरांत आहे ॥
संत ह्याची देव संतांचे हृदयांत देवच आहे ॥१३॥

मोह मायेचे प्रकाशांत अंधार गुप्त आहे ॥
रात्रंदिन हरिभजनाने प्रकाश सुप्त आहे ॥१४॥

संत भोजराजाची वाणी अमर ठरली आहे ॥
असंतासाठी समर धडकी भरली आहे ॥१५

# ३६. पोटांत काटे कसें भरावें शाळेत शिका

नविन बांधकाम समोर बगीचा सुंदर होती शाळा ॥
ओसरी मध्यें खुर्ची कपाळी टीळा गुरुजी होता मुलखा वेगळा ॥ १॥

मुख्याध्यापक शेजारी कविराज समोर शिक्षकांचा मेळा ॥
घ्या भावळा घा कोहळा मी बगळा तूं कावळा वाद समळा ॥२॥

संत कवि होते गात संत जनाचे महान गुणगान ॥
कविता नको कवि नको सर्वच करिती संताचा अपमान ॥ ३ ॥

आर्वी पोटोबा मगच विठोबा कवि गात होते तन्मयतेने ॥
कुणी गोविंद घ्या ऽ कुणी गोपाळ घ्या ऽ प्रेम भक्ति भावाने ॥४॥

संत भोजराजांना अरसिक समजले मुका, सुका, तुका ॥
घा उधार म्हणू उदार पोटांत कांटे कसे भरावें शाळेंतच शिका ॥५॥

# ३७. हरि आलारे आला

हरि आलारे आला खूप आनंद झाला ॥
कुठें बसवूं कुठें निजवूं हृदयीच हरी बैसवीला ॥ १ ॥

आतां कसली भूक तहान रोम रोमी हरि भरला ॥
रोगराई, लोभ पळतां मायेचा पाशच तुटला ॥ २ ॥

जीकडे बघावें तिकडे हरिच दिसतो चोहीकडे ॥
नाचती गोप गोपिका वाजती मंगलमय चौघडे ॥३॥

आतां ना काम धंदा संसारी वाजतो रुपया बंदा ॥
कथा किर्तनात भजतां हरि उधान येते आनंदा ॥४॥

संत भोजराजाने जोडिता हरिशी प्रेमाचे नाते ॥
असंत खाती गोते वदति आम्हालाच सारे कळते ॥५॥

# ३८. लिखाणांत केली कटकट

लिखाणांत केली कटकट भाषणांत होती वटवट ।।
शब्दांचा वस्तरा सफाचट असंत वदणार कडवट ।।१।।

भटजीचें घर असावें सदासर्वदा शेजारी ।।
कष्टानंतरच मीळते भाकरी करिता संत चाकरी ।।२।।

आम्हाला कुठचा वेळ ऐकायला शेटजी काय बोलतो ।।
खरा खोटा तराजू काटा तामस मापाने तोलतो ।।३।।

आमुची पांडुरंगावर निष्टा कसे कळणार हो शिष्टा ।।
दुष्टांचे राज्यांत संतांना मेल्यावरच प्रतिष्ठा ।।४।।

संत भोजराज भारती संतासाठीच बनले संत ।।
गटाराची घाण करिती लिखाण लोभी राजस पंत ।।५।।

# ३९. आम्ही मतांचे भिकारी

आम्ही मतांचें भिकारी फिरतो दारोदारी ॥
शब्दांचीच करामत सारी ठरतो श्रीमंत व्यापारी ॥१॥

अश्वासन आमुचा धंदा प्रसिद्दी रुपया बंदा ॥
विषमता, जातियता संघटना चातुर्य भजतो
महानंदा ॥२॥

निवडून आला त्याचा बोलबाला पडला त्याचा मूकांला ॥
चिंध्या भाराभर एकना घड गाजिचा वाघाशी मुकाबला ॥३॥

धर्मापेक्षां राजकारण श्रेष्ठ भटजीच गुरु महावशिष्ट ॥
दाखवीती पूर्व, भूलथाप अपूर्व ध चा मा हेंच वैशिष्टय ॥४॥

संत भोजराज बनले भिकारी भीक मागती संत दारी ॥
कुणी गोविंद घ्याऽ कुणी गोपाळ घ्याऽ नफाच भारी ॥५॥

# ४० आम्ही होतो रंक

आम्ही होतो रंक बनलो राव सोन्याचा मीळतो भाव ॥१॥

आम्ही होतो भिकारी झालो व्यापारी घरी लक्ष्मी पाणी भरी ॥२॥

आम्ही होतो संत्री बनलो मंत्री रोगी येतात समजून धन्वंत्री ॥३॥

आमुची होती भट्टी रंभेची जमता गट्टी लोक वदति शेट्टी ॥४॥

आम्ही होतो वनवासी वैभव येता घरांशी बिसरलो जगाशी ॥५॥

आम्ही होतो नौकर सिनेमात बनता ज्योकर भरतो हजारोकर ॥६॥

आम्ही होतो धोरणी जशी होती करणी तशीच भरणीं ॥७॥

आमुचे लोभास नच पार भारती आमुचाच महिमा अपार ॥८॥

संत भोजराज महा चतूर विठाईचा लाभतांवर शांतीने भरले घर ॥९

# ४१. आले देवाजीचें मना

आले देवाजीचें मना तिथे कुणाचे चालेना ॥
आले संतांचे मना तिथे देवाचे चालेना ॥१॥

आले मंत्र्याचें मना तिथे सत्तेचे चालेना ॥
आले महामंत्र्याचे मना तिथे मंत्रीपद जिरेना ॥२॥

सत्तेपुढे शहाणपण चालत नाही ॥
शहाण्यांना भिऊन सत्ता पळतच राही ॥३॥

संत असंत भक्त अभक्त एकत्र बसत नाहीं ॥
भारतातील अहिनकूलवाद संपता संपत नाहीं ॥४॥

संत भोजराज वदति विठोबा स्मरा संतांचे पाय धरा ॥
साधुसंत येति घरा तोचि दिवाळी दसरा ॥५॥



# ४४. महान् संत ठरले

जगांत संत अपकारापेक्षां जास्त करिती उपकार ॥
असंताचा व्यापार गर्वाचा देवा ऐवजी करुन घेती सत्कार ॥१॥

अंध अंधारी बैसले ! संत अंधांना दावीती देवलेणे ॥
पुढारी निवडून येतांच तयांना पडते अस्मान ठेंगणे ॥२॥

जन हो बना संत ! नका बाळगू खंत ! धरा शहाणपणा ॥
विठोबा चरणी वहा नम्रता हवा कशाला मी चा बहाणा ॥३॥

कष्टामधूनच नीघते संतांची वाट बापजाद्यांची वहिवाट ॥
पोटापुरते देवाने देतांच धरा पंढरीचीच वाट ॥४॥

संत भोजराज लोभ विसरले चैन भोगाला मुकले ॥
तरीच भारतांत तुकारामानंतर महान् संत ठरले ॥५॥



# ४५. देवा सगुण तव मूर्ति

देवा ! सगुण तव मूर्ति बघतांच येते मला स्फूर्ति ॥
निर्गुणातील मम भक्तिभाव पसरली जगांत कीर्ति ॥१॥

गोड तुझे नाम गोड तुझे रुप ध्यास लागला जीवा ॥
नच उरली आशा निराशा नच उरला कसला हेवा ॥२॥

दिनरात तुझेच वेड असंत वदति मला बेडर बेरड ॥
करायचं कुणाशी काय ? मी आनंदे धरिले तुझेच पाय ॥३॥

ज्ञानेश नामा तुकयाची संगत रोहिदास, सुरदास बसली पंगत ॥
मिराई, जनाई वाढते अमृत नंतर येते खूप गंमत ॥४॥

संत भोजराज झाले धन्य कानी शीरतां संतवाणी ॥
नयन हृदअि भरतां पाणी मुखांतून स्रवते गोड गाणी ॥५॥

# ४६. जडले रामनामी चित्त

प्रभूजी शुभ मंगल दिन आला ॥
उभारा गुढी ! बांधा तोरणांच्या माळा ॥१॥

करा देह स्वच्छ शुद्ध अंतःकरण ॥
मुखे गा प्रभूचेच गीत गान ॥२॥

वाचे बोलावे बहू गोड ॥
दुरुक्तीची टाकून द्यावी खोड ॥३॥

ध्येय धारणास्मरा ! मनाचा निश्चय करा ॥
शरण जा प्रभूला रूकमा देवीच्या वरा ॥४॥

संत भोजराज झाले नौकरी निवृत्त ॥
देहाने होता मुक्त जडले रामनामी चित्त ॥५॥

# ४७. आमुचें घरीं

आमुचें घरीं जे येणार त्यांचे स्वागतच होणार ॥
स्वार्थियांचें कानी पडतांच रामनाम धूम पळत सुटणार ॥१॥

आम्ही पाहिले जग सर्वदूर पळसाला तीनच पान ॥
जगाचें कल्याणा साठींच भरले इतिहासाचें पान ॥२॥

संसार केला नेटका तो कधींच नव्हता फाटका ॥
इंद्रिय मना लावीले वळण गुरुच ठरला संत तुका ॥३॥

कमवा गमवा ह्याचा आम्हां आला आतां कंटाळा ॥
सरळ वृत्ती, शुद्ध आचरणाने संसारी नच झाला घोटाळा ॥४॥

संत भोजराजांना संत कृपेने सांपडले संतांचे चरण ॥
जनतेची करिता सेवा उत्तम झाले उदर भरण ॥५॥



# ४८, वाजे पाऊल आपुले

वाजे पाऊल आपुले म्हणे मागे कोण आले ॥
आपुली आपुल्यालाच वाटली भीती मन दचकले ॥१॥

वाजे पाऊल आपुले म्हणे मागे कोण आले ॥
मी ! मी ! माझे ! माझे ! अज्ञान भूताने पछाडले ॥२॥

वाजे पाऊल आपुले म्हणे मागे कोण आले ॥
देह आत्म्याचे ज्ञान दोघांतील फरक नच कळले ॥३॥

वाजे पाऊल आपुले म्हणे मागे कोण आले ॥
संतांनी भक्तीभावाने हरिचे पाऊल ओळखले ॥४॥

संत भोजराजांनी नम्रपणे प्रभूचे पाऊल वंदिले ॥
पदी घुंगरू बांधताच मंदिरांत नाचूं लागले ॥५॥

# ४९. राम प्रहरी फोडीत टाहो

राम प्रहरी फोडीत टाहो कविता करित होती हायहाय ॥
बघां माझे रुप रंग गोडवां कुणी तरी द्या मला सहाय्य ॥१॥

वेडा कवि त्याने वाढिले जन नको म्हणत केळीचे पान ॥
श्रींखड, पुरी, भाजी, भजी, वरण, भात साजूक तूप छान ॥२॥

बोला पुंडलीक वरदा हरि विठ्ठल घास मुखी घाला ॥
गिरीजन हरिजन म्हणून कविला करीत होता बाजूला ॥३॥

कुणीतरी घ्याऽहो माझी कविता भरली अभंग गोणी ॥
फुकट नको कविता ! उपाशी पोटी कविचे नयनी सांचले पाणी ॥४॥

संत भोजराज वदति संपले यूग संतांचे अभंगांचें ॥
रंभा, मेनकेचा नाच दिवस दारुडे हरामी, हरामखोरांचे ॥५॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
२००४५ दि: ८/७/०१

# ५०. देवाची शपथ

देवाची शपथ खरं सांगेन ॥
खोटे बोलणार नाही ॥
वडा खातांना तेलाची पथ ॥
पाळल्याशिवाय रहाणार नाही ॥१॥

कायद्याला धरून मारणार उंच उडी ॥
उडी घेतांना अशीलावर करणार कुरघोडी ॥
स्वार्थाला धरुनच चालेल कापाकापी ॥
धर्माप्रमाणे वागणारा ठरेल पापी ॥२॥

केस जिंकली आनंद ! सुटली नच खंत ॥
शेळी, गाय, श्रमिक, संतांचा राहील अंत ॥
आजचा गरिब उद्याचा होईल श्रीमंत ॥
उडदामधील काळे गोरे म्हटले जातील पंत ॥३॥

संत भोजराज वदति जाणा धर्म अधर्म फरक ॥
मोह मायेचा फरक हाच ठरणार रौरव नरक ॥
जोडा धर्म टाळा अधर्म भज ना देवा एका ॥
संत असाल तर कोर्टाची पायरी चढूंच नका ॥४॥

# ५१. आम्ही कांहीं भलाई

आम्ही कांहीं भलाई ईच्छितो ॥
देव लगेच तृप्ती करितो ॥
आम्ही नको ते मागत असतो ॥
देव सुटतो ! हव्यासच वाढतो ॥१॥

मन चंचल काय करावें देवा ॥
संयमनाचाच लगाम उपयोग करावा ॥
जीभेला गोड गोड खायची जडता ईच्छा ॥
कष्टाची भाजी भाकरी हीच मागावी भीक्षा ॥२॥

आम्ही रागाने दुसऱ्याला देतो शिवी ॥
समजावी अवगुणांत भर पडली नवी ॥
बोलणे सोपे जगणे कठिण आहे ॥
कष्ट करणें बरें ! चैनीत धोका आहे ॥३॥

संत भोजराज गुणांनी गुणातीत ठरले ॥
तपश्चर्येचे फळ अहो ! संतच बनले ॥
जन निंदोत ! वानोत ! नच देवाला विसरले ॥
त्यामुळेंच मायेचे पाश अचूक तुटले ॥४॥

• • •

# ५२. संत मार्गाने चालायचें

आम्ही कांहीं करितो लोक नांवे ठेवितात ॥
जे निरुद्योगी त्यास मोठे श्रीमंत वदतात ॥१॥

आम्ही पायाने चालतो दळभद्रा समजतात ॥
पुढाऱ्यांचे थापेबाजीस सहज बळी पडतात ॥२॥

आम्ही सत्य बोलतो ऐकायला लोक तयार नसतात ॥
धट्टी कट्टीं गरिबी पापीस ! राम राम करितात ॥३॥

जो कष्टाचे खातो त्यास हरामी म्हणतात ॥
हरामखोराकडचे अन्न तिर्थ प्रसाद संबोधतात ॥४॥

संत भोजराज वदति ऐकावे जनाचे करावे मनाचें ॥
रांत्रदिवस हरि भजन संत मार्गानेच चालायचे ॥५॥

# ५३. मन भजनांत रंगले

बरें झाले देवा ! डोळ्यांना भूर चढली ॥
ती कुणाची कोण ? बघायची कटकट नुरली ॥१॥

बरें झाले देवा ! श्रुतीने लोळण घेतले ॥
रुम झुम घुंगरांचा नाद कानांत भुंगे शीरले ॥२॥

बरें झाले देवा ! भूक वनवासी बनली ॥
पत्नी पळाली माहेरा शांतीची पोळी पिकली ॥३॥

बरें झाले देवा ! मायेचा विसर पडला ॥
देणं घेणं नव्हतंच तुझाच लोभ जडला ॥४॥

संत भोजराजांचें हो देवानेच केले भले ॥
लहानपणींच अनासक्ती मन भजनांत रंगले ॥५॥

# ५४. देवा अजब तुझी करणी

देवा ! अजब तुझी करणी ॥
भक्तीचीच पाया भरणी ॥
हसूं असूं पडता तव चरणी ॥
शद्धानंदे गळते झरणी ॥१॥

देवा ! अजब तुझी लिला ॥
प्याला दुःखानेच भरला ॥
जीवा शीवाची होता भेट ॥
विसर दुःखाचा पडला ॥२॥

देवा ! अजब तुझा खेळ ॥
हां ! हां ! म्हणतां गेला वेळ ॥
तुझेच पायी बांधीता चाळ ॥
संत घालीती गळ्यात माळ ॥३॥

देवा ! अजब तुझी करणी ॥
अमृताने भरली बरणी ॥
झारीतुन पडतां अमृत धार ॥
जो ! तो ! म्हणतो वा ! उधार ॥४॥

संत भोजराज करिती भजन ॥
देह कर्ज पडले गहाण मन ॥
संतांचे धुता पाद चरण ॥
कीर्ति रुपेच उरले धन ॥५॥

# ५५. आम्ही डॉक्टर

आम्ही डॉक्टर देतो औषध ॥
रोगी मरू देतच नाहीं ॥
मरायला आमची हरकत नाही ॥
पैसा भरतांच मरणाचा दाखला देई ॥१॥

आम्ही वकील खोटे बोलत नाहीं ॥
शद्बांची कसरत हीच सर्कस पाही ॥
केस सुटली आम्हांला सुतक नाही ॥
बोलाचाच पैसा अर्थ हीच दानत राही ॥२॥

आम्ही आचार्य पदवीनेच मान राही ॥
नम्रतेचा ज्ञानाशीं संबंध ठाऊक नाही ॥
नराचा नारायण ध्येय विद्यामंदीर राही ॥
कपींच्या लिलांत घेराव प्रगत्ति पाही ॥३॥

आम्ही संत्री उद्याचे मंत्री सत्ताच राही ॥
कधी उधार सदा उदार नरम, गरम बेशरमी पाही ॥
आम्ही काय बोलतो नशाच म्हटली जाई ॥
सत्तेपुढे शहाणपण चालतच नाही ॥४॥

संत भोजराजांना असंतांचा कळला कावा ॥
त्यामुळेंच माथे विरुद्ध अभंगांचा असतो दावा ॥
गंगेच पाणी देत अर्घ्य गंगेंत सोडायचे असते ॥
विष अमृतांतील फरक मायेंत गुंतायचे नसते ॥५॥

# ५६. दम मारो दम

दम मारो दम ॥
फिर न पडेगी कम ॥ धृ ॥
मुखमे रखो राम ॥
भरो गांजा ! भरो गांजा !
होता आग गांजा संगम ॥
जल जायेगा तम ॥१॥

दम मारो दम ॥
फिर न पडेगी कम ॥ धृ ॥
लेके हरिका नाम ॥
खाओ पत्ती, जर्दा पान ॥
होता जर्दा पानका मिलन ॥
भग जायेगी शरम ॥२॥

दम मारो दम ॥
फिर न पडेगी कम ॥ धृ ॥
सबसे उंचा दम ॥
तन मनका गम ॥
संत भोजराजने मारा दम ॥
आनंद शांती बना सरगम ॥३॥

दम मारो दम ॥
फिर न पडेगी कम ॥ धृ ॥

# ५७. श्रमिकांची निघाली दिंडी

श्रमिकांची निघाली दिंडी आघाडीला संत ॥
असंतांना आला संताप संत ज्यांना नापसंत ॥१॥

चालला विठ्ठल नामाचा गजर टाळ मृदुंग पताका ॥
ज्ञानदेवाचे पाठोपाठ शेवटी होता संत तुका ॥२॥

ज्ञानमय प्रकाशमय मार्गे जातां नच उरला खेद खंत ॥
एक मेकां मारिती मीठी सर्वांचाच होता सुपंथ ॥३॥

संतांनी संसार केला नेटका दिंडी गेली गंगापार ॥
संतांचे स्वागतासाठी होता उभा रुकमादेवि वर ॥४॥

संत भोजराजांनी लिहीली गीता देवाचे हाताने ॥
भारती नांदो संत राज्य ह्याच प्रचार हेतूने ॥५॥



# ५८. बहती है गंगा

बहती है गंगा तूं हात धो ले प्यारे ॥
जिस गंगा को प्रेम भक्ति के है दो किनारे ॥१॥

चलती का नाम गांडी जो मंदिर के पास खडी ॥
" विद्या ददाति विनयम् " भगवानकी सबसे बात बडी ॥२॥

पढत मूर्ख गर्व को छोड जोड तूं ज्ञान धर्म ॥
विद्या मंदिरमे आये संत धर्म का मिलता है मर्म ॥३॥

सत्ता संपत्ती की मांग गटारगंगा दुर्गंध गर्व ॥
ज्ञान के पुजारी होते संत उंची सेवा कर्तव्य कर्म ॥४॥

संत भोजराज को समझाना सोपा है आसान ॥
ज्ञान के प्रकाश मे संतो की कसोटी होती पैचान ॥५॥

# ५९. सावताने पेरिला मळा

सावताने पेरिला मळा ॥
सर्वच संत झाले गोळा ॥
गोड होता सर्वांचा गळा ॥
लागला विठोबाचा लळा ॥१॥

संत्री, मोसंबी, लिंबू होता पेरुंचा बाग ॥
केळी, ऊस, आंबा वसंती गळत होती साग ॥
खारट, आंबट, तुरट कडवट नव्हता रस ॥
साखरेहून गोड फळांची पडत होती रास ॥२॥

सहकार तत्व संतांना होते पसंत ॥
पक्ष, पंथ, वर्गवारी नव्हता कुणी भेदी असंत ॥
देवाचे नांव संतांचे गांव गाती गाणी ॥
नामदेव तुकाराम बगीच्याला देत होते पाणी ॥३॥

कष्ट, वाढ, वाटप होता त्रिवेणी संगम ॥
श्रम बुद्धिचे दिसत होते हिरवे रान ॥
एक मेकां साह्य करुं हाच होता सुपंथ ॥
मुद्दलांत नव्हता तोटा संतांना खेद ना खंत ॥४॥

संत भोजराजांनी लोकशाहीत केली संत लावणी ॥
संतांचेच परंपरेसाठी प्रचारक गोड गाणी ॥
संत प्रसाद घ्याहोऽ खाहोऽ फोडिती टाहो ॥
असंत वदति संतांचे हातचे चालत नाही होऽ ॥५॥

# ६०, भटजींचा निधर्म

भटजींचा निधर्म भारती शेटजी भोवती नाचतो ॥
श्रमिकांचा धर्म शेवटी अंधश्रद्धेने बरबाद होतो ॥१॥

भटजींचा अधर्म वर्तमानपत्र रेडिओ वरती घुमतो ॥
श्रमिकांचा धर्म अंधभक्तिने अंधाराला कवटाळीतो ॥२॥

भारती जेथें जाल तेथे शेटजींचा भटजी सांगाती ॥
भारत हा आमुचा दोघेही एकच सुरांत गीत गाती ॥३॥

भारती शेटजीचे राज्य भटजी प्रचाराने चालविती ॥
श्रमिक गरिबी हटवा फोडीत टाहो भटजी मागे धांवती ॥४॥

संत भोजराज वदति बा श्रमिकांनो ! डोळे उघडून बघा ॥
संत असंत एक नव्हे !भटजींचे नादी लागू नका ॥५॥

REFBK-0020045
REFBK-0020045



## —: संत भोजराज ह्यांचे प्रकाशित वाङमय :—

| | | | |
|---|---|---|---|
| ● | अदलाबदल | (कादंबरी) | किंमत ३ रु. |
| ● | काळीसाखर | (कथा-संग्रह) | किंमत ३ रु. |
| ● | पंचामृत | (कथा-संग्रह) | किंमत २ रु. |
| ● | चौरंग | (कथा-संग्रह) | किंमत ३ रु. |
| ○ | अमरगीत | (कविता-संग्रह) | किंमत २ रु. |
| ● | राधाकृष्ण गीत | (कविता-संग्रह) | किंमत २ रु. |
| ● | मी संत कां बनलो? | (प्रबंध-संग्रह) | किंमत २ रु. |
| ● | चोरखाई | (संगीत-नाटिका) | किंमत २ रु. |
| ● | संत सरिता | (कविता-संग्रह) | किंमत २ रु. |
| ● | संत दुहिता | (कविता-संग्रह) | किंमत २ रु. |


: पुस्तके मिळण्याचे ठिकाण :

**अशोक प्रकाशन**

सावदा, जि. जळगांव